# निविदा दाखल करणे/निविदा उघडणे याबाबतचा तपशील

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा मागविण्याचा दिनांक | दिनांक २८ / ०९ /२०२१ ते दिनांक ०५ / १० /२०२१ |
| ०२ | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०५/१० /२०२१ रोजी<br>संध्या १६.०० वाजेपर्यंत.<br>दोन लिफाफा पध्दतीमध्ये . |
| ०३ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | **तांत्रिक निविदा** - दिनांक ०६ / १० /२०२१ रोजी सायंकाळी १६.०० वाजता उघडण्यात येतील.<br><br>**व्यावसायिक निविदा** - ज्या निविदाकारांच्या तांत्रिक निविदा मंजूर होतील अशा निविदाकारांना व्यावसायिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ कळविली जाईल. |
| ०४ | संपर्क अधिकारी | श्री. प्रकाश विठल कोर,<br>प्रमुख लिपीक, पत्रव्यवहार शाखा,<br>गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>भ्रमणध्वनी क्रमांक.८०८७८००६६९ |

**मुदतीत सादर न केलेल्या निविदांचा या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची नोंद सर्व निविदाकारांनी घ्यावी. तसेच वर नमूद दिनांकामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे बदल झाल्यास त्याबाबत या कार्यालयाचे अधिकृत वेबसाईट www.mahacid.gov.in वर जाहिर करण्यात येईल.**

**(रंजन कुमार शर्मा)**
पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन)
अपोमसं, गुअवि, म.राज्य, पुणे यांचे कार्यालय.

Cb/parab/canteen

Scanned with CamScanner

**लिफ़ाफ़ा क्रं. १ मध्ये तांत्रिक** माहीती खालील प्रमाणे देण्यात यावी -

**निविदा कारांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

१. निविदाकार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरध्वनी सह

२. निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे पुर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह

३. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company incorporation / Shop Act)

४. निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card.

५. निविदाकार कंपनीचे मागील ३ वर्षांचे Income Tax Return.

६. निविदाकार कंपनीचे वस्तू व सेवाकर (GST) Registration Certificate.

७. सदर कामाचे शासकीय व निमशासकीय संस्थेमधील अनुभव असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांसह. (सोबत work order / Purchase Order जोडणे बंधनकारक)

८. निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक व मालकाचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालु / प्रलंबित नसली पाहीजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहीजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र रु. १०० च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे.

**लिफ़ाफ़ा क्रं. २ व्यावसायिक** मध्ये सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे दर सादर करण्यात यावे.

| अ. क्र | तपशील |
|---|---|
| १ | मासिक भाडे रक्कम कमीत कमी रू.२०००/- व त्यापेक्षा अधिक |
| २ | निविदाधारकाचे मेनू कार्ड नुसार दरपत्रक. |

व्यावसायिक लिफाफ्यामध्ये सादर करण्यात येणारे दर हे निविदाकारांनी त्यांचे लेटर हेड वर सादर करावेत, तसेच तांत्रिक लिफाफा व व्यावसायिक लिफाफामध्ये सादर करण्यात येणारे प्रत्येक कागदपत्रावर निविदाधारकांचा शिक्का व सही असणे बंधनकारक आहे.

**( रंजन कुमार शर्मा )**
पोलीस उप महानिरीक्षक, प्रशासन,
अपोमसं, गुअवि, म.राज्य, पुणे यांचे कार्यालय.

Scanned with CamScanner

# दरपत्रक सूचना/ अटी व शर्ती

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पाषाण रोड, म.राज्य, पुणे कार्यालयाच्या आवारातील कॅन्टीन चालविण्यास दयावयाचे असून किमान तीन वर्ष अनुभव असल्याचे अथवा स्वत : हॉटेल व्यावसायिक असल्यास मागील पाच वर्षाचे हॉटेल चालविण्याचे योग्य ती कागदपत्रे/घोषणापत्र आणि सर्वात जास्त मासिक भाडे रक्कम देणारे व खाद्यपदार्थांतील न्यूनतम दरपत्रकधारकांस ११ महिन्याच्या कालावधीकरिता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दयावयाची आहे. तरी इच्छुक पुरवठादारांनी यासोबत जोडलेल्या यादीमध्ये खाद्यपदार्थांचे प्रकार व दरासहीत दरपत्रके दिनांक २८/८/२०२१ ते दि. ०५/१०/२०२१ या कालावधीत सादर करावयाची आहेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दरपत्रक सोबत खालील नमूद प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रके कार्यालयास सादर करावीत. व खाली नमूद मागणी केलेप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे दरपत्रकांसोबत सिलबंद लिफाफ्यात कार्यालयास सादर करावी. आवश्यक अटी व सूचना यादी खालीलप्रमाणे.

१. निविदा धारकांनी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या नावे सोबत जोडलेल्या पदार्थांच्या यादीप्रमाणे दर सादर करावेत.

२. व्यवसायासाठी आवश्यक ते परवाने उदा. शॉप ॲक्ट, लायसेन्सस , पोलीस परवाना, अन्न व भेसळ Food and Drug Administration/ Food inspector कडिल उचित दाखला नियमानुसार फि भरून स्वत: निविदाधारकाने दयावयाचे आहे. तसेच ते दर्शनी भागावर लावायचे आहेत. कॅन्टीन करिता नियमानुसार योग्य ते सिलेंडर वापरणे आवश्यक आहे. याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकांची राहील.

३. जो दरपत्रकधारक जास्तीत जास्त मासिक भाडे रक्कम दर्शविल, त्याची निविदा मंजूर करण्यात येईल. अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही.

४. कॅन्टीनचा वापर हा संबंधित निविदाधारकानेच करावयाचा असून कोणासही परस्पर पोटभाडयाने अगर विक्रीने हस्तांतरण करता येणार नाही. अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास करार रद्द करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याप्रमाणे मिळकत परत अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग यांचेकडून ताब्यात घेण्यात येईल.

५. कॅन्टीनमध्ये नेमण्यात येणारा सर्व स्टाफ ची माहिती (मूळ पत्ता, सध्याचा पत्ता, आधार कार्डच्या छायांकित प्रतीसह) कार्यालयास सादर करण्यात यावी.

६. कॅन्टीनमध्ये नेमण्यात येणारा स्टाफ कोणत्याही गुन्हेगारी पार्श्वभुमीचा नसावा. सदर स्टाफचे पोलीस व्हेरिफेकेशन करणेकामी आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास उपलब्ध करून देणे आपणांस बंधनकारक राहिल.

Cb/parab/canteen

Scanned with CamScanner

७. निविदा स्विकृतीपासून ०८ दिवसांच्या आत सहा महिन्याचे भाडे रक्कम अनामत (सुरक्षा ठेव बिनव्याजी) म्हणून रोखपाल, गुअवि, पुणे यांचेकडे रोख स्वरूपात जमा करावी लागेल. करारनाम्याचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

८. प्रथम वर्षामध्ये सेवा व सुविधांचा दर्जा योग्य असल्यास पुढील एक वर्षासाठी मासिक भाडयात भाडेवाढ करून मुदत वाढविण्याबाबत गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे कार्यालयामार्फत निर्णय घेण्यात येईल.

९. भाडेकरारासाठी येणारा खर्च स्टॅम्पपेपर, मसुदा फी, रजिस्ट्रेशन फी इत्यादी खर्च हा निविदा धारकाने स्वत: करावयाचा आहे. व भाडे करार स्वखर्चाने नोंदणीकृत करून देणे बंधनकारक आहे.

१०. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे कार्यालयाची मिळकत कोणत्याही तारखेपासून मासिक भाडेकराराने दिली असली तरी त्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून भाडे भरावे लागेल. दरमहाचे भाडे पुढील महिन्याचे १० तारखेपुर्वी भरावे. न भरल्यास अनामत रक्कम जप्त करून कोणतीही पुर्वसूचना न देता करारनामा संपुष्टात आणण्यात येईल.

११. उपहारगृहाची वेळ सकाळी ०८.०० ते संध्याकाळी ०७.०० पर्यंत अशी राहील.

१२. निविदाधारकास कॅन्टीन / उपहारगृहाच्या जागेव्यतिरिक्त इतर जागेचा वापर करता येणार नाही. त्याविरूध्द कुठल्याही तक्रारीस निविदाधारक स्वत: जबाबदार राहील. मिळकत ज्या कारणासाठी घेतली आहे. त्याच कारणासाठी वापर करावा अन्यथा करार रद्द करण्यात येईल.

१३. कॅन्टीन जागेत समाजावर विपरित परिणाम होईल असा व्यवसाय करता येणार नाही.तसेच स्फोटक पदार्थांचा साठा ,मद्य, नशा येणा-या पदार्थांची साठवण, विक्री करता येणार नाही. कॅन्टिनसाठी लागणारे व्यावसायिक सिलेंडर साटी परवानगी असेल पंरतू त्याचा साठा करता येणार नाही. कॅन्टिन साठी घरगुती सिलेंडरच्या वापरास परवानगी नसेल.

१४. कॅन्टीनमध्ये देण्यात आलेल्या खाद्य पदार्थांचा दर्जा आणि त्याबाबत भविष्यात समस्या उदभवल्यास त्यास निविदाधारक स्वत: च जबाबदार राहील.

१५. कराराने दिलेल्या जागेची तपासणी व चौकशी करण्याचा संपुर्ण अधिकार अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना राहील.

१६. उपहारगृहामध्ये भांडी व इतर साहित्य निविदाधारकांने स्वत: आणावे. उपहारगृहामध्ये ताजे व स्वच्छ पदार्थांची विक्री केली पाहिजे. विक्री करणा-या पदार्थाचे नावे व माफक दर दररोज दर्शनी ठिकाणी लावण्यात यावेत. उपहारगृहाची व आजूबाजूची साफसफाई निविदाधारकाने स्वखर्चाने करावयाचे आहे.

१७. उपहारगृहात बालकामगारांना ठेवण्यात येवू नये. कर्मचा-यांचा गणवेश स्वच्छ असावा. तसेच प्रत्येक ३ महिन्यांनी कर्मचा-याची वैद्यकिय तपासणी करण्यात यावी. कामगार कायदयातील तरतुदी पाळणेची जबाबदारी संबंधित निविदाधारकांची राहील.



Scanned with CamScanner

१८. भाडेकराराची मुदत संपल्यानंतर विना विलंब ताबा अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांचेकडे दयावा लागेल. मुदतीत ताबा न दिल्यास सर्व चीज, वस्तू अतिक्रमण समजून जप्त करण्याचा अधिकार अपर पोलीस महासंचालक , गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना राहिल.

१९. निविदा धारकाने एकदा निविदा सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव निविदा मागे घेता येणार नाही.

२०. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे कार्यालयाने वितरित केलेल्या उपहारगृहाच्या जागेची भविष्यात कोणत्याही कारणास्तव अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे कार्यायलास आवश्यकता भासल्यास कार्यालयाने सूचना दिल्यानंतर १५ दिवसाचे आत कोणतेही कारण न देता जागा रिक्त करून दयावी लागेल. याकामी कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. मुदतीत जागा रिक्त करून न दिल्यास नियमानुसार सक्तीने कारवाई करून ताबा घेणेत येईल. तसेच निविदाधारकास मुदतीपुर्वी व्यवसाय बंद करणे असल्यास कमीत कमी ०३ महिने या कार्यालयास नोटीस देणे आवश्यक आहे.

२१. निविदाधारकाने कॅन्टीनच्या प्रस्तावित जागेची कार्यालयीन वेळेत पाहणी करावी. किचन व कॅन्टीनसाठी लागणारे सर्व साहित्य स्वखर्चाने आणावयाचे आहे.

२२. भाडे भरत असल्याने निविदाधारकास जागा ताब्यात ठेवण्याचे/ वापरण्याचे कोणतेही हक्क(Tenancy Rights) राहणार नाहीत.

२३. सदरील कराराबाबतचा कुठलाही वाद/न्यायालयीन प्रकरण इत्यादी फक्त पुणे शहर येथील मा. न्यायालयात अथवा मॅजिस्ट्रेट अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडे चालविता येईल.

२४. Fire Audit व Fire Safety चे तंतोतंत पालन करतील.

वरील अट क्रमांक ०१ ते २४ मी वाचल्या असून त्या मला मान्य असून माझ्यावर बंधनकारक राहतील.

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन)
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.

---

निविदाधारकाची स्वाक्षरी-

निविदाधारकाचे नाव व पत्ता-

Cb/parab/canteen

Scanned with CamScanner